# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.०१/२३/अ.क्र.६५९६/२५/०१**

**श्री. रमेश सूर्य नारायण गुप्ता**
A/९, योगी निवास गृह निर्माण संस्था
बंदर पाखाडी रोड, कांदिवली (प.) मुंबई-४०००६७

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी आर/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहाय्यक आयुक्त
आर/दक्षिण विभाग यांचे कार्यालय,स.व प.तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी छेद रस्ता क्र.२, कांदिवली (प), मुंबई ४०००६७

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.१०.२०२५रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, डॉ. पूजा रो. देसाई उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग अनुपस्थित आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा जाधव उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता यांनी दाखल केलेल्या त्यांच्या दि.१५.०७.२०२२ रोजीच्या जोडपत्राच्या अनुषंगाने त्यांनी दाखल केलेल्या दि.१८.०६.२०२२ रोजीच्या तक्रार अर्जावर दाखल केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी दि.२६.०७.२०२२ रोजी अपिलार्थी यांचा अर्ज वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आर/दक्षिण विभागकडे अग्रेषित करण्यात आले असल्याचे सुचित केले आहे. त्यानंतर संबंधित विभागाने अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर कार्यवाही देखील

केलेली असून प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबद्ध देखील करण्यात आलेले आहे. त्यानंतर अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता यांनी दि.३०.०८.२०२२ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून त्यावर दि. २९.०९.२०२२ रोजी सुनावणी सुचना पाठविण्यात आली असून ऑनलाईन पद्धतीने दि.०६.१०.२०२२ रोजी कोविड विषाणुचा प्रभाव लक्षात घेता सुनावणी घेण्यात आली. त्यावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता आर/दक्षिण विभाग यांनी अपिलार्थी हे गैरहजर असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी याआधीच अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर कार्यवाही केली असल्याचे तसेच कार्यालयीन अभिलेखात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती त्यांना विहीत मुदतीत सुचित केले असल्याचे नमूद करीत प्रस्तुत प्रथम अपील अर्ज निकाली काढला आहे. त्याविरुद्ध अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता यांनी दि.०९.०१.२०२३ रोजी द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

आज झालेल्या सुनावणीस अपिलार्थी श्री. रमेश गुप्ता गैरहजर असून विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशील या आधीच त्यांना सुचित केला असल्याची वस्तुस्थिती तसेच उपरोक्त प्रकरणातील विषय हा सन २०२२ या कालावधीतील असल्याने या आधी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेला आदेश व प्रत्यक्षात झालेली कार्यवाही लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra

१६.१०.२०२५